# प्रकरण - २

# अध्ययन आणि एकाग्रता

**पु**स्तके मुबलक प्रमाणात आणि अल्प किमतीत उपलब्ध आहेत. वेद, शास्त्रे, पुराणे देखील प्राप्त करून ती वाचणे प्रत्येकास शक्य आहे. गुरुजनांचीही कमतरता नाही. अनेक विद्यापीठे असून ती प्रदर्शनीय प्रकारे ज्ञानदान करीत आहेत. मनाला प्रशिक्षित करण्यासाठी मुबलक सुविधा सहज उपलब्ध आहेत. परंतु तरीही ज्ञानामृत प्राशन करून संतोषिलेला स्वर कुठेच ऐकू येत नाही.

जेव्हा मी चोहीकडे पसरलेले पुस्तकांचे ढीग पाहतो, त्या वेळी मला वाटते की, या पुस्तकांमधील ज्ञान जाड आवरण भेदून प्रकाशात येण्यास असमर्थ आहे. काम, क्रोध, मत्सर अणि स्वार्थ यांच्या पर्वतराजींनी परमेश्वर झाकला गेला आहे. तसेच हा ज्ञानसूर्यही या पुस्तकांच्या विशाल ढिगांनी झाकला गेला आहे. ही पुस्तके जगाच्या कानाकोपऱ्यात पसरली असली तरीही त्यामुळे माणसाच्या सुसंस्कृततेमध्ये किंवा त्याच्या ज्ञानात वाढ झाली आहे, असे आढळत नाही. मानव पूर्वीच्या वनमानवापेक्षा फारच प्रगत झाला आहे, असे वाटत नाही. सुबक बांधणी, मोहित करणारे शीर्षक आणि सुंदर चित्रे असलेल्या पुस्तकाच्या शोधात वाचक असतो. म्हणजेच तात्पुरते सुख आणि क्षणिक समाधान याचीच ओढ असते. विवेक बुद्धीने पुस्तके निवडून, वाचनातील बोध प्रत्यक्ष आचरणात आणणारेच फक्त सत्य जाणून परमानंद प्राप्त करतात. अशा लोकांचेच जीवन सार्थ ठरते. म्हणूनच जे आत्मोन्नती इच्छितात आणि ज्यांना भगवत् चिंतनात आनंद मिळतो त्यांनी केवळ ऋषी-मुनी आणि संत-महात्म्यांची चरित्रे आणि ईश्वर चिंतनास उद्युक्त करणारी पुस्तके वाचावी. निरुद्देशपणे हाताशी आलेले पुस्तक वाचून भ्रम आणि संदेह वृद्धिंगत होतात. अशा वाचनामुळे कसलाही लाभ होत नाही आणि

शांतीही प्राप्त होत नाही.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक कार्य एकाग्रतेने करण्याची वृत्ती जोपासली पाहिजे. समदृष्टी म्हणजेच शुभदृष्टी.

वनराज असला तरीही जंगलातून हिंडणारा सिंह काही पावले चालल्यावर मागे वळून पाहतो; कारण त्याचा कोणी पाठलाग करण्याची त्याला भीती वाटते. मनातील भीती दृष्टीला अस्थिर करते. हृदयातील हिंसाभाव दृष्टिकोन विकृत करतो आणि दृष्टीला विचलीत करतो.

माणसाला समदृष्टी अत्यावश्यक आहे. सर्व सृष्टी त्याच्या समदृष्टीला शुभ प्रतीत झाली पाहिजे. त्याचे स्वत:वर जितके प्रेम व विश्वास आहे, तेवढ्याच प्रेमाने, विश्वासाने त्याने सर्व प्राणिमात्रांकडे पाहिले पाहिजे. कारण सृष्टीमध्ये कणभरही दुष्टता नाही. दोष हा पाहणाऱ्याच्या दृष्टीत असतो. ज्या रंगाचा चष्मा आपण वापरतो, त्या रंगाची सृष्टी दिसते. सृष्टी स्वभावत:च निरंतर शुद्ध आणि पवित्र आहे.